# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालयीन विभाग)**


जा.क्र./गो.वि./महा.वि./573 /२०२१ दिनांक :27/१०/२०२१

## परिपत्रक

विषय :— महाविद्यालयातील पारंपारिक पदवी अभ्यासक्रमाच्या भाग २ व ३ मधील प्रवेश क्षमतेत नैसर्गिक वाढीने प्रवेश देण्याबाबत.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२०–२१ या सत्राचे पदवी अभ्यासक्रमातील बहुतांश महाविद्यालयाचे निकाल १०० टक्के असल्यामुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचीत राहु नये, याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अंतर्गत विद्यापरीषदेच्या वतीने पदवी अभ्यासक्रमातील बी. ए. व बी.एस्सी. भाग २ व ३ मधील मंजूर मुळ प्रवेश क्षमतेत नैसर्गिक वाढीने प्रवेश देण्यासाठी शैक्षणिक सत्र २०२१–२२ करिता मा. कुलगुरू महोदयांनी मंजूरी प्रदान केलेली आहे.

सदर नैसर्गिक वाढ ही केवळ सन २०२१–२२ करीता लागू असून वाढीव प्रवेश क्षमतेपोटी आपल्या महाविद्यालयाला कोणतीही नविन तुकडी, नवीन अतिरिक्त पद मंजुर केले जाणार नाही. तसेच याबाबतचा कोणताही आर्थिक भार शासन उचलणार नाही.

करीता उक्तप्रमाणे नमुदनूसार बी.ए व बी.एस्सी भाग २ व ३ मध्ये नैसर्गिक वाढीने प्रवेश देण्याकरीता मान्यता देण्यात येत असून नियमानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावे.

तसेच प्रकरणपरत्वे नैसर्गिक विस्ताराच्या अभ्यासक्रम/विषय/अतिरिक्त तुकडीस मंजुरी घ्यावयाची असल्यास शासन निर्णय क्र. एनजीसी २००८/(९८/०८)/ मशि–४ दि. १४ मार्च, २०११ च्या शासन आदेशानुसार आवश्यक कार्यवाही घ्यावी.

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये,

(डॉ. जी डी. दुबे)
उपकुलसचिव प्र.
महाविद्यालय विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रत माहीती व कार्यवाहीस्तव:— मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.


एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com